सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन


## समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-411 001.

दूरध्वनी क्र .20-26122752 फॅक्स क्र.020-26126698 ईमेल -sakalyanpuneest@gmail.com


## -: रिक्त पदे सरळसेवेने भरण्यासाठी जाहिरात :-

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-2014/प्र.क्र.45/12,दि. 3 जून 2014 नुसार समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या आस्थापनेवरील खालील रिक्त पदे भरण्याकरिता निवड यादी तयार करण्यासाठी मागासवर्गीय प्रवर्गातील सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात **महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे (एम.के.सी.एल.)** यांच्या http://oasis.mkcl.org/dsw2014 या संकेतस्थळावर अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | | प्रवर्गनिहाय पदे | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | एकूण रिक्त पदे | अ.जा | अ.ज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | अ-विमाप्र (अल्पसंख्याक ) | ई-विमाप्र (मराठा) | खुला |
| | | (अ) नियमित वेतनावरील पदे (Group - I) | | | | | | | | | | |
| १ | | गृहपाल / अधिक्षक (महिला/पुरुष) वेतन बॅन्ड रु.9300-34800, ग्रेड वेतन रु. 4300 | | | | | | | | | | |
| | 44 | 6 1 माजी सैनिक, 2 महिला | 1 | 0 | 0 | 2 1 माजी सैनिक | 1 | 0 | 8 1 माजी सैनिक 3 महिला | 1 | 4 1 माजी सैनिक 1 महिला | 21 3 माजी सैनिक, 7 महिला 1 प्रकल्प ग्रस्त, 1 अंध अल्पदृष्टी 2 अंश कालीन, 1 खेळाडू |
| 2 | | वरिष्ठ लिपीक वेतन बॅन्ड रु.5200-20200, ग्रेड वेतन रु. 2400 | | | | | | | | | | |
| | 70 | 9 1 माजी सैनिक 2 महिला 1 अंशकालीन | 5 1 माजी सैनिक 1 महिला 1 अंशकालीन | 2 1 महिला | 1 | 3 1 महिला | 1 | 0 | 17 3 माजी सैनिक 1 प्रकल्प ग्रस्त 5 महिला 1 अंध अल्पदृष्टी 2 अंश कालीन 1 खेळाडू | 2 1 महिला | 5 1 माजी सैनिक 1 महिला 1 अंश कालीन | 25 4 माजी सैनिक, 1 प्रकल्पग्रस्त 1 अंध अल्पदृष्टी 8 महिला 3 अंशकालीन 1 खेळाडू |

| | | प्रवर्गनिहाय पदे | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | एकूण रिक्त पदे | अ.जा | अ.ज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | अ-विमाप्र (अल्पसंख्याक ) | ई-विमाप्र (मराठा) | खुला |
| 3 | | | समाज कल्याण निरिक्षक वेतन बँन्ड रु.9300-34800, ग्रेड वेतन रु. 4200 | | | | | | | | | |
| | 15 | 2 1 माजी सैनिक 1 महिला | 3 1 महिला 1 अंशकालीन | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 1 अपंग | 0 | 1 1 महिला | 7 1 माजी सैनिक, 1 भूकंपग्रस्त 2 महिला 1 अंशकालीन 1 खेळाडू |
| **4** | | | कनिष्ठ लिपीक वेतन बँन्ड रु. 5200-20200, ग्रेड वेतन रु 1900 (Group - II) | | | | | | | | | |
| | 4 आयुक्तालय पुणे | **0** | **0** | **1** | **0** | **1** | **0** | **2 1 महिला** | **0** | **0** | **0** | **0** |
| | 39 मुंबई विभाग | **3 1 महिला** | **3 1 महिला** | **0** | **0** | **2 1 महिला** | **0** | **4 1 माजी सैनिक 1 महिला** | **0** | **1** | **4 1 माजी सैनिक 1 महिला 1 अंशकालीन** | 22 4 माजी सैनिक, 7 महिला **1 प्रकल्पग्रस्त 1 भुकंपग्रस्त** 1 अंध अल्पदृष्टी 3 अंश कालीन, 2 खेळाडू |
| | 35 नाशिक विभाग | **1** | **0** | **0** | **2 1 महिला** | **3 1 महिला** | **0** | **1** | **2 1 महिला** | **1** | **4 1 माजी सैनिक 1 महिला** | **21** 3 माजी सैनिक, 6 महिला 1 प्रकल्पग्रस्त 1 अंध अल्पदृष्टी 2 अंश कालीन, 1 खेळाडू |
| | 55 पुणे विभाग | **6 1 माजी सैनिक 2 महिला 1 अंशकालीन** | **5 1 माजी सैनिक 2 महिला 1 अंशकालीन** | **0** | **2 1 महिला** | **2 1 महिला** | **2 1 महिला** | **0** | **10 2 माजी सैनिक 3 महिला 1 प्रकल्पग्रस्त 1 अंशकालीन 1 खेळाडू** | **1** | **4 1 माजी सैनिक 1 महिला** | **23 3 माजी सैनिक 5 महिला 1 प्रकल्पग्रस्त 1 भुकंपग्रस्त 1 अंध अल्पदृष्टी 1 कर्णबधीर 2 अंशकालीन 2 खेळाडू** |

| | | प्रवर्गनिहाय पदे | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ क्र | एकूण रिक्त पदे | अ.जा | अ.ज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | अ-विमाप्र (अल्पसंख्याक ) | ई-विमाप्र (मराठा) | खुला |
| | 37 औरंगाबाद विभाग | **3 1 महिला** | **4 1 माजी सैनिक 1 महिला** | **0** | **0** | **0** | **0** | **1** | **8 1 माजी सैनिक 2 महिला 1 अंशकालीन** | **1** | **3 1 महिला** | **17 3 माजी सैनिक 5 महिला 1 प्रकल्पग्रस्त 1 अंध अल्पदृष्टी 2 अंशकालीन 1 खेळाडू** |
| | 22 लातुर विभाग | **0** | **4 1 माजी सैनिक 1 महिला** | **0** | **1** | **0** | **0** | **1** | **9 1 माजी सैनिक 3 महिला 1 प्रकल्पग्रस्त 1 अंध अल्पदृष्टी 1 अंशकालीन 1 खेळाडू** | **0** | **1** | **6 1 माजी सैनिक 2 महिला 1 अंशकालीन** |
| | 23 अमरावती विभाग | **5 1 माजी सैनिक 2 महिला 1 अंशकालीन** | **2 1 महिला** | **2 1 महिला** | **0** | **1** | **0** | **0** | **10 2 माजी सैनिक 2 महिला 1 प्रकल्पग्रस्त 1 अंध अल्पदृष्टी 1 अंशकालीन 1 खेळाडू** | **0** | **0** | **3 1 महिला** |
| | 58 नागपूर | **8 1 माजी सैनिक 2 महिला 1 प्रकल्पग्रस्त 1 अंशकालीन 1 खेळाडू** | **3 1 महिला** | **2 1 महिला** | **0** | **2 1 महिला** | **2 1 महिला** | **2 1 महिला** | **7 1 माजी सैनिक 2 महिला 1 अंशकालीन** | **2 1 महिला** | **5 1 माजी सैनिक 1 महिला 1 अंशकालीन** | **25 6 माजी सैनिक 6 महिला 1 प्रकल्पगस्त 1 भुकंपगस्त 1 अंधअल्पदृष्टी 1 कर्णबधीर 3 अंशकालीन 2 खेळाडू** |

टिप :- 1) रिक्त पदांच्या एकूण संख्येत व संवर्गनिहाय/प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट होऊ शकेल.

2) प्रत्येक पदसंख्येच्या खाली त्या पदासाठी असलेले समांतर आरक्षण दर्शविलेले आहे. उपरोक्त दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झालेस त्याच राखीव प्रवर्गासाठी इतर पात्र उमेदवारांचा नियमानुसार विचार केला जाईल.

## -: शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| 1 | **गृहपाल / अधिक्षक (महिला/पुरुष)** वेतन बॅन्ड रु.9300-34800, ग्रेड वेतन रु. 4300 | 1) उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण केलेला असावा.<br>2) खालील शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>अ) ज्यांच्याकडे मान्यताप्राप्त संस्थेची शारिरीक शिक्षणाची पदवी किंवा पदवीका आहे<br>ब) खेळामध्ये प्राविण्य मिळवलेले असावे.<br>3) सदर पदासाठी परिविक्षा कालावधी 1 वर्षाचा राहिल. |
| 2 | **वरिष्ठ लिपीक** वेतन बॅन्ड रु.5200-20200, ग्रेड वेतन रु. 2400 | 1) उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केलेला असावा.<br>2) सदर पदासाठी परिविक्षा कालावधी 1 वर्षाचा राहिल. |
| 3 | **समाज कल्याण निरिक्षक** वेतन बॅन्ड रु.9300-34800, ग्रेड वेतन रु. 4200 | 1) उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी धारण केलेला असावा.<br>2)सदर पदासाठी परिविक्षा कालावधी 1 वर्षाचा राहील. |
| 4 | **कनिष्ठ लिपीक** वेतन बॅन्ड रु.5200-20200, ग्रेड वेतन रु. 1900 | 1) उमेदवार हा एस.एस.सी. उत्तीर्ण असावा.<br>2) उमेदवार हा जी.सी.सी. बोर्डाची मराठी टंकलेखनाची 30 श.प्र.मि.ची किंवा इंग्रजी टंकलेखनाची 40 श.प्र.मि.ची परिक्षा उत्तीर्ण असावा. |

## सर्वसाधारण अटी :-

उपरोक्त अनुक्रमांक 1 ते 6 पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून स्पर्धा परीक्षेसाठी (लेखी ) महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे Maharashtra Knowledge Corporation Ltd. (MKCL) Pune यांच्या मार्फत अर्ज मागविण्यात येत आहेत. अधिक माहिती मिळण्याचे ठिकाण/(संकेत स्थळ) http://oasis.mkcl.org/dsw2014 ही वेबसाईट दिनांक – 20 **सप्टेंबर** 2014 पर्यंत कार्यरत राहील.

1 **वयोमर्यादा - उमेदवाराची कमाल वयोमर्यादा दिनांक 20.8.2014 रोजी गणण्यात येईल**
अ) गृहपाल, या पदासाठी किमान वयोमर्यादा 25 वर्षे राहील. समाज कल्याण निरिक्षक, वरिष्ठ लिपिक कनिष्ठ लिपीक , सहाय्यक शिक्षक या पदासाठी किमान वयोमार्यादा 18 वर्षे राहिल. खुल्या संवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 33 वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा 38 वर्ष राहील.
ब) अपंग प्रवर्गातील/प्रकल्प ग्रस्त उमेदवारांसाठी 45 वर्षे ही कमाल वयोमर्यादा राहील.
क) पदवीधर अंशकालीन उमेदवारासाठी वयोमर्यादा 46 वर्षे राहील.
ड) अत्युच्च गुणवत्ताधारक राष्ट्रीय व राज्य स्तरावरील स्पर्धेमधील गुणवत्ताधारक खेळाडुंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून उच्च वयोमर्यादा 5 वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.
इ) सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शुध्दीपत्रक दि. 20.8.2010 अन्वये माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग 3 मधील पदांवर नेमणूकीसाठी विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलातील झालेल्या सेवेचा कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील .

2 महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशासन-2000/ प्र.क्र.5 / 2001/32, दि.20.7.2002 व दि.19 मार्च 2003 अन्वये उपरोक्त पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवारांनी संगणक हाताळणी/वापराबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.

3 उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (वास्तव्य प्रमाणपत्र आवश्यक आहे.) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याचे शासनाने प्राधिकृ त केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणी वेळी सादर करणे आवश्यक आहे.

4 उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार आहे. परीक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज एम.के.सी.एल.या संस्थेच्या संबंधित अधिकृत प्रशिक्षण केंद्रावर उपलब्ध होईल. या अधिकृत केंद्रांची माहिती http://oasis.mkcl.org/dsw2014 या संकेतस्थळावर मिळेल.

5 सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील ऑन लाईन अर्ज भरणेसाठी एम.के.सी.एल.च्या संबंधित अधिकृत प्रशिक्षण/ सेवा केंद्राची मदत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी 10.00 पासून सायंकाळी 6.00 पर्यंत घेता येईल. उमेदवारांनी आयुक्तालयाकडे / आयुक्तालयाच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयाकडे परस्पर अर्ज करु नयेत, केल्यास त्या अर्जाचा विचार केला जाणार नाही , याची विशेष नोंद घ्यावी.

6 **उपरोक्त गट – 1 मधील, अ.क्र. 1 ते 3 पदांसाठी एकच अर्ज भरावा तसेच या पदांसाठी किमान अर्हता (पदवी) असल्याने त्या पदाची एकत्रित सामायिक बहुपर्यायी परिक्षा घेण्यात येईल. (Group I) उमेदवाराने आवेदन पत्रात पदाचा पसंतीक्रम स्पष्टपणे नमूद करावा.**

7 कनिष्ठ लिपिक पदाच्या लेखी परिक्षेसाठी जे उमेदवार अर्ज भरतील त्यांनी समाज कल्याण आयुक्तालय पुणे तसेच ज्या विभागासाठी अर्ज भरावयाचा आहे त्या बाबतचा अर्जामध्ये स्वयंस्पष्ट उल्लेख करावा. **गट – II मधील सर्व विभागाची परिक्षा एकाच वेळेत व एकाच दिवशी होणार असल्याने उमेदवाराने त्यांच्या पसंतीचा कोणताही एक विभाग निवडावा** उमेदवारांने ज्या विभागासाठी लेखी परिक्षेचा अर्ज भरला आहे त्याच विभागाच्या निवडीसाठी त्याचा अर्ज ग्राहय धरण्यात येईल. कोणत्याही सबबीवर अर्जात नमुद केलेल्या विभागाची गट – II च्या अर्जात अदलाबदल होणार नाही. आयुक्तालयातील पदे भरताना सर्व विभागीय स्तरावरील उच्च गुणवत्ताधारक उमेदवारांमधुन तसेच उमेदवारांच्या आयुक्तालयातील पसंती क्रमानुसार सदरची पदे भरली जातील.

8 वरीलप्रमाणे सर्व पदासाठी 200 गुणांची बहुपर्यायी लेखी परिक्षा राहील. सदर लेखी परिक्षेमध्ये प्रत्येक 4 चुकीच्या उत्तरासाठी 1 गुण वजा केला जाईल .

9 वरील जाहिरातीमधील सर्व पदासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना रु.500/-(रु.पाचशे फक्त) तर मागासवर्गीय उमेदवारांना रु.250/-(अक्षरी रु.दोनशे पन्नास फक्त) परीक्षा प्रक्रिया शुल्क जाहिरातीत नमूद केलेल्या पध्दतीनुसार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत भरावे लागेल. माजी सैनिकांना अर्जासोबत भरती प्रक्रिया शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

**<u>ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती</u>**

A)ऑनलाईन अर्ज एम.के.सी.एल.च्या http://oasis.mkcl.org/dsw2014 या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

B)ज्या पदासाठी उमेदवार ऑनलाईन अर्ज भरणार आहे त्या पदाची जाहिरातीमध्ये नमूद केलेली पात्रता काळजीपूर्वक वाचावी. लहान कुटूंब असल्याबाबतच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना सदर संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

C)उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्वत:चा अलीकडील काळातील पासपोर्ट फोटो स्वत:जवळ असल्याची खात्री करावी.अर्ज भरतेवेळी स्वत: चा फोटो व सही स्कॅन करुन अपलोड करावी.

D)ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर Apply Online या लिंकवर क्लिक करुन अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

E)ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे, ते पद निवडा. एक-एक करत आपणांस ऑनलाईन विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरासाठी योग्य पर्याय निवडा .संगणक प्रणाली तुम्ही दिलेल्या उत्तराच्या आधारे तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.

F)ऑनलाईन अर्ज अचूक भरण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील. त्या अनुषंगाने कोणतीही तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही.

G)जर प्राथमिक पात्रता चाचणीत आपण पात्र असाल ,ज्या पदासाठी अर्ज भरावयाचा आहे, ते पद निवडा आणि आवश्यक माहिती भरा.

H)आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणालीत तुमचा लॉग-इन (Login) आयडी (ID) आणि पासवर्ड (Password) निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रीनवर दाखवेल आणि तुम्ही पुरविलेल्या भ्रमणध्वनि क्रमांकावर एसएमएस (SMS) करेल. (कृपया आपला भ्रमणध्वनि (मोबाईल क्रमांक अचूक टाकावा) तुमचा लॉग-इन आयडी म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असेल. याची नोंद घ्यावी.

I)जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र ,पुणे /कौशल्यविकास कार्यालय, आदिवासी विकास व जिल्हा सैनिक कार्यालयाकडे नांवनोदंणी केली असली तरी वरील पदासाठी रितसर ऑनलाईन अर्ज करते वेळी भरणे आवश्यक आहे. तसेच कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे अनिवार्य राहील.

J) उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करतांना सतत कार्यान्वित असलेला भ्रमणध्वनि (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा जेणेकरुन आपणांस संपर्क साधून आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

K)ऑनलाईन अर्ज करण्याचे वेळापत्रक

| अ.क्र | तपशिल | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| 1 | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दि.22/8/2014 | दि.15/9/2014 |
| 2 | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) यांचे शाखांमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | दि.23/8/2014 | दि.17/9/2014 |
| 3 | ज्या उमेदवारांनी दिनांक – 15/9/2014 पर्यंत ऑनलाईन नोंदणी केली असेल व ज्या उमेदवारांनी बॅंकेमध्ये दि.17/9/2014 पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांचेसाठी उर्वरित ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | दि.20/9/2014 | |

10 लेखी परिक्षेची तारीख व ठिकाण एम.के.सी.एल.च्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल. नियमानुसार लेखी परिक्षा उत्तीर्ण व गुणवत्तापात्र उमेदवार घेण्यात येईल. लेखी परीक्षेचे विषय ,ठिकाण व वेळापत्रक याबाबत स्वतंत्रपणे एम.के.सी.एल.च्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल तसेच उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या ई-मेलवर तसेच अर्जात नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे स्वतंत्रपणे कळविण्यांत येईल. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. उमेदवारांना लेखी परिक्षेसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

11 ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदनशुल्क मुदतीत अदा केले आहे व संपुर्ण माहिती भरुन फॉर्म अॅप्रुव्ह (approve) करुनच प्रिंट काढावी. त्यांनाच लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र (हॉलतिकीट) त्यांच्या लॉग ईन आयडीद्वारे MKCL च्या वरील नमूद संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल किंवा MKCL च्या अधिकृत प्रशिक्षण केंद्रावरुन प्राप्त करुन घेता येईल. या साठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

12 परिक्षा केंद्रावर ओळखपत्रासह परिक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा येणाऱ्या व प्रवेशपत्र न आणणाऱ्या उमेदवारांना परिक्षेकरिता प्रवेश दिला जाणार नाही, तसेच उमेदवारांनी स्वत:चे फोटो असलेले ओळखपत्र उदा.वाहन परवाना, पॅनकार्ड,निवडणूक ओळखपत्र इ. सोबत आणणे बंधनकारक राहील.

13 उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचणी आल्यास त्यांनी 9326552525 या क्रमांकावर संपर्क साधावा.

14 विहित वयोमर्यादेतील शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने किंवा कार्यालय प्रमुखांकडे विनंती अर्ज करुन भरता येतील.

15 महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती/ भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.8) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दि.29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज. (क), भ.ज.(ड), विशेष मागासप्रवर्ग व इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे अद्यावत वैध असलेले (नॉनक्रिमीलेअर) प्रमाणपत्र परिक्षेपुर्वी प्राप्त करणे आवश्यक आहे.

महिला आरक्षण हे महाराष्ट्र शासन, महिला व बाल कल्याण विभाग, शासन निर्णय क्र.82/2001/मसेआ-2000/ प्र.क्र.415/का.2, दि.25 मे 2001 मधील तरतूदीनुसार राहील. खुला प्रवर्ग , अ-विमाप्र (अल्पसंख्यांक), ई-विमाप्र (मराठा) या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे अद्ययावत वैध असलेले (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र परिक्षेपुर्वी प्राप्त करणे आवश्यक आहे.

17 महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसुचना क्र.एसआरव्ही-2000/ प्र.क्र.17/(2000) /12, दि.28 मार्च 2005 व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही. 2000/ प्र.क्र.17/2000/12, दिनांक 1 जुलै 2005 नुसार लहान कुटूंब असल्याचे सोबतच्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

18 खेळाडू या समांतर आरक्षित पदांसाठी त्या त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम व्दीतीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा खेळाडू. राज्य अजिंक्यपद स्पर्धा याचा सदर खेळांच्या अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात.किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्य मिळविणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार करण्यात येणार नाही.
अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासकीय /निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी आरक्षण, ठेवण्याबाबत शालेय शिक्षण व क्रिडा विभाग शासन निर्णय क्रमांक राक्रीधो-2002/प्र.क्र.68/ क्रियुसे-2 दि.30 एप्रिल 2005 अन्वये जिल्हास्तर / राज्यस्तरावरील खेळाडू शासन निर्णयानुसार जिल्हा क्रिडा अधिकारी / मा. संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील प्रमाणपत्रप असलेले उमेदवार .

19 पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांना शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक पअंक-1097/1793/प्र.क्र.-4/98/16-अ दि.19 मार्च,1998 व दि.26 ऑगस्ट 2005 नुसार गुणामध्ये नियमानुसार सवलत अनुज्ञेय राहील अशा उमेदवारांनी त्यांच्या अनुभवाची सेवा योजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.

20 अपंग प्रवर्गातील उमेदवारांना अल्पदृष्टी-अंधत्व किंवा क्षीणदष्टी, अंशत: कर्णबधिर=श्रवणशक्तीतील दोष, अस्थिव्यंग - चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु असे संबोधण्यात यावे. तसेच अपंगत्वाचे प्रमाण किमान 40 टक्के असल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र संबधित वैद्यकीय मंडळाकडून प्राप्त करुन घेतलेले असावे.

21 पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेता लेखी परिक्षेत गुणवत्तेच्या आधारे निवडलेल्या व /समान गुण धारण करणा-या त्या त्या संवर्ग/प्रवर्गाच्या उमेदवारांमध्ये ते धारण करीत असलेली उच्च/विशेष शैक्षणिक अर्हता, जाहिरातीतील नमूद प्रशिक्षण व अनुभव विचारात घेता उमेदवारांची यादी गुणवत्तेनुसार मर्यादित केली जाईल. अशी यादी महाराष्ट्र ज्ञान महामंडळ,पुणे (एक.के.सी.एल.) च्या संकेत स्थळावर (Website) प्रसिध्द केली जाईल, याबाबत उमेदवारास कोणताही दावा सांगता येणार नाही.

22 **<u>रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे.</u>** त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, जाहिरातीमध्ये अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे स्वत:कडे राखून ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

23 उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तथापी जात वैधता प्रमाणपत्र असल्यास तसे नमुद करावे. अन्यथा उमेदवाराची अंतिमत: निवड झाल्यानंतर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे जाती वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत शासनाने विहित केलेल्या नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार सुधारीत श्रेणीनुसार वेतन व भत्ते मिळतील. निवड झालेल्या उमेदवाराची समाज कल्याण आयुक्तालयाच्या अंतर्गत असलेल्या राज्यातील कोणत्याही कार्यालयात नियुक्ती करण्यात येईल आणि त्यांच्या सेवा बदलीपात्र असतील. तसेच नियुक्ती होणा-या उमेदवारास महाराष्ट्र शासन निर्णय दि.1 नोव्हेंबर 2005 अनुसार लागू करण्यात आलेली अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

24 निवड प्रक्रीया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील व भा.दं.वि. संहिता चे कलम 199 व 200 (2) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

25 एखाद्या अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रीयेतून अपात्र ठरविण्यांत येईल.

26 मागासवर्गीय उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील रिक्त जागांवरही अर्ज करता येईल.

आयुक्त,समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**स्थळ** : पुणे
**दिनांक** : 18 ऑगस्ट 2014